# <u>प्रेसनोट</u>

## <u>संरक्षित प्राणी वेल माशाची उलटी</u> (Ambergris) <u>जप्त करुन कारवाई केलेबाबत...</u>

| | |
|---|---|
| कक्ष | मालमत्ता कक्ष, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई |
| गु.र.क्र. व कलम | मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे वि.स्था.गु.र.क्र. ०९/२०२२, कलम २, ३९, ४४, ४८(अ), ४९(ब), ५७, ५१ वन्य प्राणी संरक्षण कायदा १९७२ |
| दाखल दिनांक | दिनांक १९/०७/२०२२ |
| गुन्हा घडला दिनांक, वेळ व ठिकाण | दिनांक १९/०७/२०२२ रोजी १२.३० वा. चे पूर्वी.<br>ठिकाण - ट्रायडन्ट ऑबेरॉय हॉटेलच्या समोर, मरीन ड्राईव्ह सी फेसवर मुरली देवरा चौक, एन. एस. रोड फूटपाथ, मुंबई. |
| फिर्यादीचे नांव | श्री धुळदेव दादा कोळेकर, वय ३४ वर्षे, व्यवसाय-नोकरी, पो.शि. क्र. ०९.०६०७/मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई. |
| आरोपींची संख्या | एकूण ०१ |
| मुद्देमाल | हस्तगत वेल माश्याची उलटी (Ambergris) चे वर्णन :- लाल, फिक्कट करडा व फिक्कट राखाडी रंगाचे एकूण २.६१६ किलो वजनाचे, अं.कि.रु २,६०,००,०००/- |
| थोडक्यात प्रेस नोट | खालीलप्रमाणे... |

काही महिन्यांपूर्वी दापोली, जिल्हा रत्नागिरीचे किनारपट्टीवर वेल मासे मिळून आलेबाबत बातमी प्रसिध्द झाली होती. वेल मासा हा परिशिष्ट - २, वन्यजीव संरक्षण कायदा अन्वये संरक्षित प्राणी म्हणून घोषित केलेला असून त्याची उलटी (Ambergris) याची खरेदी-विक्रीवर शासनाने प्रतिबंध केलेला आहे. त्याची चोरटया मार्गाने विक्री होत असलेबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली होती.

मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखेचे पो.नि. समीर शेख यांना दिनांक १९/०७/२०२२ रोजी त्यांच्या गुप्त बातमीदाराकडून माहिती प्राप्त झाली होती की, एक इसम वेल माशाची उलटी (Ambergris) घेऊन ती विक्री करण्याचे उद्देशाने ऑबेरॉय हॉटेल समोर, मुरली देवरा चौक, एन. एस. रोड, मुंबई याठिकाणी येणार आहे. त्यानुसार वन विभागाचे अधिकारी यांना संपर्क करुन पंच, वन विभागाचे अधिकारी व पोलीस पथकाने आवश्यक ते साहित्यासह ऑबेरॉय हॉटेलसमोर, मुरली देवरा चौक, एन. एस. रोड, मुंबई परिसरात पाळत ठेवण्यात आली होती. काही वेळाने गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीप्रमाणे एका संशयित इसमास हटकले असता त्याचे ताब्यात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला वेल माशाची उलटी (Ambergris) हा पदार्थ मिळून आला. त्याची वन अधिकारी यांनी पाहणी करुन खात्री केली असता त्याचे एकूण वजन २.६१६ ग्रॅम असल्याचे व त्याची अं.कि.रु. २,६०,००,०००/- (रुपये दोन करोड साठ लाख) असल्याची माहिती दिली. त्याचा वापर उच्च दर्जाचे सुगंधित द्रव्यामध्ये करण्यात येतो.

**ताब्यात घेतलेला इसम.**
१) एक पुरुष इसम, अंदाजे वय २५ वर्षे, रा.ठि. ता. दापोली, जिल्हा रत्नागिरी.

नमूद कारवाईचा सविस्तर पंचनामा करुन ताब्यात घेतलेल्या इसमाविरुध्द मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची उत्तम कामगिरी मा. सुहास वारके, सह पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. विरेश प्रभु, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), मा. दत्ता नलावडे, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) यांचे मार्गदर्शनाखाली मा. सावळाराम आगवणे, सहाय्यक पोलीस आयकुत (डी स्पेशल) यांच्या निगराणीखाली मालमत्ता कक्ष, गु.प्र.शा., मुंबई या कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक शशिकांत पवार, पो.नि. सत्यजीत ताईतवाले, समीर शेख, संदीप निगडे, स.फौ. सुभाष काळे, पो.ह. उमेश राऊत, अरुण सावंत, तुषार सावंत, विनोद पदमन, पो.ना. सचिन सावंत, संतोष औटे, पो.शि. धुळदेव कोळेकर, पो.शि.चा. मुकुंदे व गायकवाड यांनी महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे.

माहितीकरिता सविनय सादर...